**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

परिवार देवता मंदिरे खंडाने देणेबाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या मालकीच्या पंढरपूर शहर व परिसरातील परिवार देवता मंदिरे खंडाने देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार ज्यांना सदरची मंदिरे खंडाने घ्यावयाची आहेत. त्यांनी इकडील विहित नमुन्यात अर्ज दि.०५/१०/२०१७ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करावेत. या संबंधीची माहिती, अर्जाचा नमुना, अटी व शर्ती तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

क्र.नित्योपचार विभाग/का.वि./८१५/२०१७ दि.१४/०९/२०१७

स्वा/—

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२४४६६, ९७६३४४३८२१)

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**

परिवार देवता मंदिरे खंडाने देणेबाबत.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे...............**

१. परिवार देवता मंदिरांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मंदिराचे नाव व पत्ता |
|---|---|
| (१) | (२) |
| १ | श्री. विष्णूपद मंदिर, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| २ | श्री. विष्णू मुर्ती मंदिर, विष्णूपद मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| ३ | श्री. डगरी वरील विष्णूपद व डगरीवरील समाधी मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| ४ | श्री. नारद मंदिर, विष्णूपद मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| ५ | श्री. मारूतीचा पार, चंद्रभागा घाट, सारडा भवन जवळ, पंढरपूर |
| ६ | श्री. रिध्दी सिध्दी गणपती मंदिर, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील मंदिर, रध्दी सिध्दी गणपती मंदिर जवळ, गोपाळपूर रोड, पंढरपूर. |
| ८ | श्री. शनि काळभैरव मंदिर, संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप समोर, महाद्वार, पंढरपूर. |
| ९ | श्री. शाखंबरी मंदिर, महाद्वार, पंढरपूर. |
| १० | श्री. खंडोबा मंदिर, महाद्वार, पंढरपूर. |
| ११ | श्री. सोमेश्वर मंदिर, चंद्रभागा घाट, पंढरपूर. |
| १२ | श्री. रेणूका माता मंदिर, विणेगल्ली, पंढरपूर. |
| १३ | श्री. यमाई — तुकाई मंदिर, सांगोला रोड, पंढरपूर. |

| | |
|---|---|
| १४ | श्री. यल्लमा देवी मंदिर, केंद्र महाराज मठाजवळ, सांगोला रोड, पंढरपूर. |
| १५ | श्री. पद्यमावती मंदिर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, स्टेशन रोड, पंढरपूर. |
| १६ | श्री. तहसिल कचेरीसमोरील मारूती मंदिर, तहसिल कार्यालय जवळ, पंढरपूर. |
| १७ | श्री. व्यापारी कमिटी मारूती मंदिर, नवीपेठ, व्यापारी कमिटी जवळ, पंढरपूर. |
| १८ | श्री. रामबागेतील मारूती मंदिर, रामबागेच्या आतील बाजूस, रामबाग, पंढरपूर. |
| १९ | श्री. व्यासनारायण मंदिर, कॉटेज हॉस्पिटल जवळ, पंढरपूर. |
| २० | श्री. अंबाबाई मंदिर, अंबाबाई पटांगण, सोलापूर रोड, पंढरपूर. |
| २१ | श्री. लखुबाई मंदिर, कोळी गल्ली, पंढरपूर. |
| २२ | श्री. सटवाई मंदिर, दत्त घाटाच्या बाजूस, दत्तघाट, पंढरपूर. |
| २३ | श्री. रोकडोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. |
| २४ | श्री. त्र्यंबकेश्वर व खंडोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. |
| २५ | श्री. नरसोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. |
| २६ | श्री. पुंडलिक मंदिरासमोरील समाधी, चंद्रभागा नदीपात्र, पुंडलिक मंदिरासमोर, पंढरपूर. |
| २७ | श्री. काळा मारूती मंदिर, प्रदक्षिणा मार्ग, पंढरपूर |
| २८ | श्री. सटवाई मंदिर, काळा मारूती मंदिराजवळ, प्रदक्षिणा मार्ग, पंढरपूर |

२. नमूना अर्ज कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. अर्ज भरून दि. ०५/१०/२०१७ सायं.५.००वा. पर्यंत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३. अर्जासोबत अनामत रक्कम रू.१०००/— रोख स्वरूपात भरणे आवश्यक आहे. अर्ज व अनामत रकमेचा डि.डी. सिलबंद पाकिटात दि.०५/१०/२०१७ रोजी सायं.५.००वा. पर्यंत सादर करणे आवश्यक राहील. **सिलबंद पाकिटावर अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रं. व परिवार देवता मंदिर खंडाने घेण्यासाठीचा अर्ज असे नमुद करणे आवश्यक आहे.** सिलबंद अर्ज उघडण्याची दिनांक व वेळ फोनद्वारे कळविण्यात येईल. सदरचे अर्ज संत तुकाराम भवन येथे सर्व अर्जदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या अर्जदारांना त्यावेळी इतर अर्जदाराने नमुद केलेल्या खंडापेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या अर्जदाराने जास्तीत जास्त खंड नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त खंड बोलला असेल त्याच्या नावे मंजुर करण्यात येईल.

४. अर्जदारास सदर परिवार देवतांच्या नित्योपचार व सर्व वार्षिक सण व उत्सवांची सांगोपांग माहिती असणे आवश्यक आहे.

५. नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/ आधारकार्ड/ ड्रायव्हींग लायसंन्स/राष्ट्रीय बॅकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. ज्याचे नावे मंजुर होईल त्यांनी वर्षभराची खंडाची होणारी २५% रक्कम सात दिवसात भरणा केली पाहिजे आणि उर्वरीत ७५% रक्कम पुढील एक महिन्यात भरणे आवश्यक आहे.

७. मंदिरे रोज स.६.०० ते रा.१०.०० पर्यंत भाविकांसाठी उघडी ठेवणे आवश्यक आहे. तसेच सण व उत्सव कालावधीत भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेवून यापेक्षा जास्त वेळ उघडी ठेवणे आवश्यक आहे.

८. सदर मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांना दर्शनरांगेची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

९. मंदिरात सेवक व पुजारी नियुक्त करताना, त्यांना सदर देवतांची पुजा विधीचे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे. तसेच ते निर्व्यसनी असणे आवश्यक आहे.

१०. अर्जदारास ज्या परिवार देवतांचे मंदिर खंडाने घ्यावयाचे आहे. त्यांना सदर परिवार देवतांची पुजा, अर्चा, उत्सव, सण इ. माहिती व ज्ञान असणे आवश्यक आहे.

११. सदर परिवार देवतांची मंदिरे ११ महिन्यांसाठी खंडाने देण्यात येतील. जर सदर कालावधी समाधानकारक आढळल्यानंतर अर्जदार मुदतवाढीस पात्र राहील.

१२. ज्यांना खंडणीने परिवार देवताचे मंदिर मंजुर होईल. त्याठिकाणची मुर्तीची, सुरक्षतेची, नित्योपचार, पुजा – अर्चा, सण – उत्सव, स्वच्छता, पारंपारिक पध्दतीचे पोशाख इ. ची जबाबदारी आपली राहील. तसेच याबाबत मंदिर समितीकडून देण्यात येणाऱ्या सुचनांचे वेळोवेळी पालन करावे लागेल.

१३. सदरबाबत आपल्याकडून काही चुक झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१४. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपल्यावर बंधनकारक राहील.

१५. सदर परिवार देवतां मंदिराची किरकोळ दुरूस्ती, रंग, मुर्ती संवर्धन इ. कामे मंदिर समितीकडून करण्यात येतील. तसेच विद्युत व पाणी पुरवठा देयके मंदिर समितीकडून देणेत येतील.

१६. ज्यांना परिवार देवता मंदिर खंडणीने मंजुर होईल. त्यांना मंदिरात भाविकांकडे कोणत्याही प्रकारची सक्ती करता येणार नाही. तसेच काही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. ज्यांना खंडणीने परिवार देवता मंदिर देण्यात येईल, त्यांनी रक्कम रू.१००/– चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidavit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

————‘‘————

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**<u>अर्ज.</u>**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– परिवार देवता मंदिर खंडाने घेणेबाबत.

पूर्ण नाव :– ______________________________

पूर्ण पत्ता :– ______________________________

______________________________

मोबाईल क्रं. :– ______________________________

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीचे पंढरपूर शहर व परिसरातील परिवार देवतां मंदिरे खंडाने देण्याबाबतची दि.२२/०९/२०१७ रोजीचे दैनिक संचार, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीप्रमाणे मी आपलेकडील परिवार देवतां मंदिर खालीलप्रमाणे खंडाने घेवू इच्छीत आहे.

| अ. क्र. | मंदिराचे नाव | खंडणीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त रक्कम रू. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | श्री. विष्णूपद मंदिर, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| २ | श्री. विष्णू मुर्ती मंदिर, विष्णूपद मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| ३ | श्री. डगरी वरील विष्णूपद व डगरीवरील समाधी मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| ४ | श्री. नारद मंदिर, विष्णूपद मंदिराजवळ, चंद्रभागा नदीपात्र, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| ५ | श्री. मारूतीचा पार, चंद्रभागा घाट, सारडा भवन जवळ, पंढरपूर | |
| ६ | श्री. रिध्दी सिध्दी गणपती मंदिर, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील मंदिर, रध्दी सिध्दी गणपती मंदिर जवळ, गोपाळपूर रोड, पंढरपूर. | |
| ८ | श्री. शनि काळभैरव मंदिर, संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप समोर, महाद्वार, पंढरपूर. | |
| ९ | श्री. शाखंबरी मंदिर, महाद्वार, पंढरपूर. | |
| १० | श्री. खंडोबा मंदिर, महाद्वार, पंढरपूर. | |
| ११ | श्री. सोमेश्वर मंदिर, चंद्रभागा घाट, पंढरपूर. | |
| १२ | श्री. रेणूका माता मंदिर, विणेगल्ली, पंढरपूर. | |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. यमाई – तुकाई मंदिर, सांगोला रोड, पंढरपूर. | |
| १४ | श्री. यल्लमा देवी मंदिर, केंद्र महाराज मठाजवळ, सांगोला रोड, पंढरपूर. | |
| १५ | श्री. पद्यमावती मंदिर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, स्टेशन रोड, पंढरपूर. | |
| १६ | श्री. तहसिल कचेरीसमोरील मारूती मंदिर, तहसिल कार्यालय जवळ, पंढरपूर. | |
| १७ | श्री. व्यापारी कमिटी मारूती मंदिर, नवीपेठ, व्यापारी कमिटी जवळ, पंढरपूर. | |
| १८ | श्री. रामबागेतील मारूती मंदिर, रामबागेच्या आतील बाजूस, रामबाग, पंढरपूर. | |
| १९ | श्री. व्यासनारायण मंदिर, कॉटेज हॉस्पिटल जवळ, पंढरपूर. | |
| २० | श्री. अंबाबाई मंदिर, अंबाबाई पटांगण, सोलापूर रोड, पंढरपूर. | |
| २१ | श्री. लखुबाई मंदिर, कोळी गल्ली, पंढरपूर. | |
| २२ | श्री. सटवाई मंदिर, दत्त घाटाच्या बाजूस, दत्तघाट, पंढरपूर. | |
| २३ | श्री. रोकडोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. | |
| २४ | श्री. त्र्यंबकेश्वर व खंडोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. | |
| २५ | श्री. नरसोबा मंदिर, हरिदास वेस, पंढरपूर. | |
| २६ | श्री. पुंडलिक मंदिरासमोरील समाधी, चंद्रभागा नदीपात्र, पुंडलिक मंदिरासमोर, पंढरपूर. | |
| २७ | श्री. काळा मारूती मंदिर, प्रदक्षिणा मार्ग, पंढरपूर | |
| २८ | श्री. सटवाई मंदिर, काळा मारूती मंदिराजवळ, प्रदक्षिणा मार्ग, पंढरपूर | |

तरी वरीलप्रमाणे परिवार देवता मंदिर खंडाने घेण्याच्या प्रक्रियेत भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रू.१०००/– रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरबाबत मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन. त्यानुसार सदरचे मंदिर मला खंडाने देण्यात यावे ही नम्र विनंती.

दिनांक /०९/२०१७ **नाव व सही**

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. अनामत रक्कम रोखीने भरल्याची पावती किंवा मुळ डी.डी.
२. मंदिरात पुजा – अर्चा करत असल्याबाबतची अनुभव प्रमाणपत्रे.
३. निवडणूक ओळखपत्र/ आधारकार्ड.
४. पॅनकार्ड.